ठाणेनगर वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

जा.क. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ७७ /२०२६ दि. ०४ /०४/२०२६

–: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

ज्याअर्थी, ठाणेनगर वाहतूक उपविभागाने हद्दीत दादोजी कोंडदेव स्टेडीयम येथे मे. टेनिस क्रिकेट स्पोर्टस फेडरेशन संस्थेमार्फत दिनांक ०४/०४/२०२६ व दिनांक ०५/०४/२०२६ रोजी **PRESIDENT CUP INDIA 2026 (ITCSF)** दिवस रात्र टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धा होणार आहे. नमुद क्रिकेट सामन्यांच्या अनुषंगाने कोअर कमिटी मधील सदस्य व टिम मालक, अभिनेते, नेते व इतर मान्यवर तसेच मोठया प्रमाणात प्रेषक वर्ग उपस्थित राहणार आहे. त्यामुळे सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी, पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे :–

प्रवेश बंद –	१) छत्रपती शिवाजी महाराज चौक, कळवा कडून व साकेत रोडने सिडको बस स्टॉपकडे जाणाऱ्या सर्व टी.एम.टी., एन.एम.एम.टी. व सर्व प्रकारच्या खाजगी बसेस यांना **क्रिकनाका** येथे **"प्रवेश बंद"** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	सदरच्या बसेस प्रवाशांना क्रिक नाका येथे सोडून व तेथून प्रवाशांना घेवून इच्छित स्थळी जातील.
प्रवेश बंद –	२) छत्रपती शिवाजी महाराज चौक, कळवाकडून, साकेत रोडने एवन फर्निचर व मुख्य बाजारपेठेत जाणाऱ्या चार चाकी, तिनचाकी व दुचाकी वाहनांना **माता रमाबाई चौक** येथे **"प्रवेश बंद"** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	सदरची वाहने माता रमाबाई चौक येथून सरळ पुढे जाऊन शितला माता चौक येथून उजवे वळण जवाहर बाग व एवन फर्निचर मार्गे इच्छित स्थळी जातील.
प्रवेश बंद –	३) सिडको बस स्टॉपकडून एवन फर्निचरकडे व मुख्य बाजारपेठकडे जाणाऱ्या सर्व प्रकाराच्या वाहनांना माता रमाबाई **चौक** येथे **"प्रवेश बंद"** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	सदरची वाहने दादोजी कोंडदेव स्टेडीयम गेट नं. ३ समोरुन गांवदेवी कट व पारेख ट्रान्सपोर्ट मार्गे इच्छित स्थळी जातील.
प्रवेश बंद –	४) एवन फर्निचर व राघोबा शंकर रोडकडून सिडको बस स्टॉप जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना जवाहर बाग **अग्निशामक केंद्र** येथे **"प्रवेश बंद"** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	सदरची वाहने जवाहर बाग, अग्निशामक केंद्र येथून उजवीकडे वळून राघोबा शंकर रोड मार्गे इच्छित स्थळी जातील.
नो पार्कींग –	**जवाहर बाग, अग्निशामक केंद्र ते माता रमाबाई चौक पर्यंत रोडचे उजवे व डावे दोन्ही बाजुस तसेच माता रमाबाई चौक ते गांवदेवी कट, महागिरी पर्यंत रोडचे दोन्ही बाजुस वाहने उभी करण्यास मनाई करण्यात येत आहे.**

सदर अधिसूचना **दिनांक ०४/०४/२०२६ व दिनांक ०५/०४/२०२६ रोजी दुपारी १४:०० वा. ते रात्री २१.०० वा.** पावेतो अंमलात राहील.

सदर वाहतूक अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका, पोलीस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनास लागू राहणार नाही.

(पंकज शिरसाट)
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर

प्रति,
जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सादर,
मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर

मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१/वि.शा. ठाणे

प्रत कार्यवाहीसाठी :–
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे, भिवंडी
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे

प्रत :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/– सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :– सपोआ ठाणे वाहतूक विभाग व पो.नि. नौपाडा, ठाणेनगर, कळवा, राबोडी वाहतूक उपविभाग, ठाणे शहर